**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

**<u>महापालिका सर्वसाधारण सभा</u>**

महानगरपालिकेच्या मंगळवार, दिनांक 26/04/2017 रोजी भरलेल्या माहे एप्रिल महिन्याच्या (मुळ सभा 18 एप्रिल 2017) सर्वसाधारण तहकुब सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 03.**<br>**दिनांक 18 एप्रिल 2017** | **(ब)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 20(5) सह वाचावयाच्या कलम 31-अ (1) व (2) अन्वये, *नामनिर्देशनाद्वारे स्थायी समितीवर 8 सदस्यांची नियुक्ती करणे. |
| **दिनांक 26 एप्रिल 2017** | 1. श्री. अशोक अंकुश गावडे,<br>2. श्री. सुरेश शिवाजी कुलकर्णी,<br>3. श्री. देवीदास अनंतराव हांडेपाटील,<br>4. श्री. विजय लक्ष्मण चौगुले,<br>5. श्री. नामदेव रामा भगत,<br>6. श्रीम. दिपाली सुरेश संकपाळ,<br>7. श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील,<br>8. श्री. द्वारकानाथ बाबू भाईर." |
| **निर्णय -** | **<u>स्थायी समितीवर 08 सदस्य नियुक्ती</u>** |

**महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी**

**माहे 18 एप्रिल 2017 ची सर्वसाधारण तहकूब सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 55, सेक्टर 11 कोपरखैरणे येथील ज्येष्ठ नागरिक संस्थेचे विरंगुळा केंद्र देण्यात यावे. यासाठी मी तशी मागणीही केली होती व पुन्हा या ठरावद्वारे मी तशी मागणी करीत आहे. आपल्या नियमानुसार 6000 स्क्वेअर मीटरची उद्यानामध्येच विरंगुळा केंद्र देतो येते. परंतु त्यामुळे अनेक विभागात 600 स्क्वेअर मीटरचे उद्याने नसल्याने अनेक ज्येष्ठ नागरिक या सोयी पासून वंचित राहतात. माझ्या प्रभागातही 6000 स्क्वेअर मीटरचे उद्यान नाही. तेव्हा ही मर्यादा कमी करून 2000 स्क्वेअर मीटर प्रस्ताव आणून करावी किंवा एखादा ओपन प्लॉट तो छोटका असेना तो हस्तांतरीत करून घेवून त्यामध्ये विरंगुळा केंद्र द्यावे.अथवा प्रभागातील समाजमंदिर हॉल किंवा महापालिकेचे शाळेत एखादा रूम ज्येष्ठांसाठी आरक्षित करावा. जेणेकरून मागणी असलेल्या जास्ती जास्त ज्येष्ठ नागरीक संस्थेसे विरंगुळा केंद्रे देता येतील. पॉलीस डिसीजनच्या नावाखाली नोंदणीकृत ज्येष्ठ नागरीक संस्थेना त्यांचा विभागात विरंगुळा केंद्रे नाकारू नयेत. माझ्या प्रभागातील ज्येष्ठ नागरीक संस्थेची विरंगुळा केंद्राची मागणी स्वीकारण्यात यावी व त्यांना विरंगुळा केंद्र देण्यात यावे. | 11<br>———<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 2. | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**<br>महापालिकेचा मुख्य दवाखाना वाशी से-10 ए येथे आहे. पण तेथे अनेक आधुनिक सोयींची व यंत्रांची सुविधा अद्याप नाही. तसेच रक्त तपासणीसाठी ही आधुनिक मशीन नाहीत, अँजीओग्राफी किंवा अँजीओप्लस्टीची सोय नाही. गरीब नागरिकांना बाहेर तपासणीसाठी जाणे भाग पडते, अल्ट्रासाऊंड, सोनोग्राफी, बॉडी स्कॅनिंग, सी.टी. स्कॅनिंग सारख्या सोयी उपलब्ध नाहीत. वाढते कॅन्सरचे प्रमाण लक्षात घेता मेमोग्राफीसाठी आधुनिक मशीन उपलब्ध नाहीत. तेव्हा या सोयी आपण महापालिकेच्या हॉस्पिटलमध्ये उपलब्ध करून द्याव्यात, प्रेगन्सी रिलेटेड चेकिंग मशीन व डिलीवरी संदर्भात लक्ष दिले जात नाही. त्यांच्या सुविधामध्ये वाढ करावी जेणेकरून गरीब मातांना व मुलांना त्याचा फायदा होईल. | 12<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 3. | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 55, सेक्टर 11 कोपरखैरणे मधील प्लॉट क्र. 34 हा ओपन प्लॉट आहे. नागरिकांची मागणी अनुसार या प्लॉटला उद्यानासाठी लवकरात लवकर आरक्षित करणे. | 13<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 4. | **श्रीम. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 96, नेरूळ, सेक्टर-16 सनशाईन हॉस्पिटल ते महालक्ष्मी सोसायटी पर्यंत पदपथाची दुरूस्ती करणे. | 14<br>एप्रिल | 1619<br>26/04/2017 | मंजूर |
| 5. | **श्रीम. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 96, नेरूळ मध्ये गटार, रस्ते, पदपथ, शाळा, उद्यान, मार्केट, मलनि:स्सारण वाहिन्या, जलवाहिन्या, स्ट्रीट लाईट, डेब्रीज व घनकचरा, बस स्थानके, वाहनतळ व इतर नागरी समस्या जाणून घेण्याकरीता शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी पाहणी करणे. | 15<br>एप्रिल | 1620<br>26/04/2017 | मंजूर |
| 6. | **श्रीम. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 96, नेरूळ मधील सेक्टर-16 ए, सेक्टर-16 व सेक्टर-18 येथील नादुरूस्त गटारांचे नुतनीकरण करणे. | 16<br>एप्रिल | 1621<br>26/042017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 7. | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 59 मधील जुहूगांव से.11 वाशी नवी मुंबई येथील जलकूंभाच्या बाजूला असलेले नागरी आरोग्य केंद्राची इमारत मोडकलीस आली आहे. सदर इमारत तोडून तेथे लग्नकार्यासाठी व इतर विधीकार्यासाठी बहूउद्देशीन इमारत उभारणे. | 17<br>एप्रिल | 1622<br>26/04/2017 | मंजूर |
| 8. | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 59 मधील जुहूगांव से.11 वाशी नवी मुंबई येथील गावदेवी मैदानात विद्युत हायमास्ट बसविणे. | 18<br>एप्रिल | 1623<br>26/04/2017 | मंजूर |
| 9. | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 59 मधील से. 11, जुहूगांव येथील साईबाबा मंदिर ते कै. सोमा कंबा पाटील निवास, मरिआई माता मंदिर ते स्वामीनागरायण मंदिर, स्वामीनारायण मंदिर ते जुहूगांव स्मशानभुमी व हनुमान मंदिर ते प्रेमनाथ भाईर बिल्डिंग या रस्त्यांचे डांबरीकरण करणे आणि सपना लॉज ते कै.मोहन भोईर निवास व श्री. रमण भोईर बिल्डिंग ते श्री. यशवंत भगत येथे इंटरलॉक बसविणे. | 19<br>एप्रिल | 1624<br>26/04/2017 | मंजूर |
| 10 | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-** घणसोली विभागात सिडकोने रस्त्यांवरील दिवाबत्तीसाठी सिमेंटच्या मुलाम्याचे लावलेले खांब धोकादायक अवस्थेत असल्याने नागरीकांच्या जिवीतास धोका उत्पन्न झालेला आहे, हे लक्षात घेऊन तातडीने धोकादायक खाबांच्या जागी वीज बचत करणाऱ्या दिव्यांसह नवीन खांब लावणे. | 20<br>एप्रिल | 1625<br>26/04/2017 | मंजूर |
| 11. | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-** मागील कित्येक वर्षांमध्ये प्रभाग क्र. 33 यामध्ये समाविष्ठ असलेल्या व आसपासच्या क्षेत्रातील रस्त्यांची व पदपथांची सिडकोने व महापालिकेने देखभाल दुरूस्ती केलेली नसल्याने येथील रस्ते पदपथांची दुरावस्था झालेली आहे. हे लक्षात घेऊन घणसोलीतील रस्ते व पदपथांची पावसाळ्यापूर्वी पुर्नबांधणी करणे. | 21<br>एप्रिल | 1626<br>26/04/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 12. | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-** मागील कित्येक वर्षामध्ये प्रभाग क्र. 33 यामध्ये समाविष्ठ असलेल्या व आसपासच्या क्षेत्रातील पदपथाखालील पावसाळी नाली गटारांची सिडकोने व महापालिकेने देखभाल दुरूस्ती केलेली नसल्याने येथील पावसाळी नाली गटारे ही गाळ, कचऱ्याने भरलेली व जागोजाग तुटलेली आहेत. त्यामुळे पावसाळ्यात नागरीकांच्या जिवितास व मालमत्तांना हानी पोहचण्याची संभाव्यता लक्षात घेऊन घणसोलीतील पावसाळी नाली गटारांतील गाळ, कचरा काढून, तुटलेल्या गटारांची पावसाळ्यापूर्वी पुर्नबांधणी करणे. | 22<br>एप्रिल | 1627<br>26/04/2017 | मंजूर |
| 13. | **श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथील विद्युत वायर अनेक घरांवरून गेल्या असल्याने बरेच अपघात झाले आहेत, त्यात 2 नागरिकांचा मृत्यु झाला आहेत. त्यामुळे विद्युत वायर भूमिगत करणे अत्यंत गरजेचे असल्याने विद्युत वायर भूमिगत करणे. | 23<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 14. | **श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथील ठाणे-बेलापूर रोड मुख्य रस्त्यावर नागरिकांना रस्ता ओलांडणेकरिता पादचारी पुल (स्कायवॉक) बांधणे. | 24<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 15. | **श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथे मुकूंद कंपनी ते आनंदनगर मुख्य रस्त्यावर पदपथ बांधून लोखंडी रॅलींग बसविणे. | 25<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **16.** | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 26, महापे मधील हनुमान नगर येथील शंकराच्या मंदिराजवळ तसेच हनुमान मंदिराजवळ बसण्यासाठी बाक बसविण्यात यावे, तसेच संभाजीनगर (आदिवासीपाडा)व सुलाईदेवी (वारलीपाडा) येथे बसण्यासाठी बाक बसविणे. | 26 / एप्रिल | 1628 / 26/04/2017 | मंजूर |
| **17.** | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 26, महापे मधील संभाजीनगर (आदिवासीपाडा), सुलाईदेवी (आदिवासी-वारलीपाडा) व अडवली भूतावली गावातील गरीब व गरजू आदिवासींना घरकूल योजने अंतर्गत घरे बांधून देण्यात यावी. येथील आदिवासींची घरे फार जूनी असून ती कच्चे स्वरूपाची असून मोडकळीस आलेली आहेत. या आदिवासींची आर्थिक परिस्थिती हालाखीची असून त्यांना नवीन घरे बांधणे शक्य होत नाही. तरी या गरीब आदिवासी बांधवांचा गांभिर्याने विचार करून त्यांना घरकूल योजने अंतर्गत घरे बांधून देणे. | 27 / मार्च | 1629 / 26/04/2017 | मंजूर |
| **18.** | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 26, महापे मधील अडवली भूतावली गावातील स्मशानभुमी येथे हायमास्ट लावण्यात यावे, या स्मशानभूमी जवळ खेळाचे मैदान तसेच इंदिरा आवास योजने अंतर्गत बांधलेली घरे असून या परिसरात रात्रीच्या वेळी खूप अंधार होत असल्याने येथे हायमास्ट लावणे खुप गरजेचे आहे. तरी येथे हायमास्ट लावणे. | 28 / एप्रिल | 1630 / 26/04/2017 | मंजूर |
| **19.** | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 12, सेक्टर-2 येथील एल.आय.जी. ग्रुप अ-विभाग, ब-विभाग, क-विभाग, ड-विभाग, ई-विभाग येथील बसविण्यात आलेले फेव्हरब्लॉक हे अतिशय ना दुरूस्त झालेले असून तात्काळ ते बदलून नविन चांगल्या दर्जाचे लिकर कोटींग फेव्हरब्लॉक बसविणे. | 29 / एप्रिल | 1631 / 26/04/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **20.** | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 12, सेक्टर-2 येथील ओव्हरहेड वाय हा वर्षानुवर्षे नागरिकांना त्रास होणारा अतिशय गंभीर विषय असून प्रभागातील राहिलेले 40% ओव्हरहेड वायरचे काम तात्काळ चालू करून अंडरग्राऊंड करून देणे. | 30 / एप्रिल | 1632 / 26/04/2017 | मंजूर |
| **21.** | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-** ऐरोली सेक्टर-19 या ठिकाणी जी पाण्याची टाकी आहे. तेथील पंप बंद अवस्थेत असल्याकारणाने ऐरोली विभागातील सेक्टर-1, 2, साईनाथवाडी, शिवकॉलीनी आणि इतर प्रभागात पाण्याचा दाब कमी प्रमाणात येतो. त्यामुळे नागरिकांना पाण्याची समस्या उद्भवत असून पाण्याच्या टाकीवरील पंप लवकरात लवकर बदलणे. | 31 / एप्रिल | 1633 / 26/04/2017 | मंजूर |
| **22.** | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-** प्र. क्र. 83, जुईनगर मधील मलनि:स्सारण वाहिन्या दररोज तुंबून रस्त्यांवर घाण पाणी येऊन प्रभागात अस्वच्छता होत असते. तरी 2003 साली बसविलेल्या मलनि:स्सारण वाहिन्या बदलून त्या जास्त व्यासाच्या बनविणे. | 32 / एप्रिल | 1634 / 26/04/2017 | मंजूर |
| **23.** | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 83, जुईनगर येथे मागणी केलेल्या ठिकाणी नागरिकांच्या सुरक्षेसाठी झेब्रा क्रॉसिंग पट्ट्यांसह नवीन स्पीड बेक्रर बनविणे आणि नागरिकांच्या सोयीसाठी तीन ठिकाणी त्वरीत वाचनालये बनविणे. | 33 / एप्रिल | 1635 / 26/04/2017 | मंजूर |
| **24.** | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-** प्र. क्र. 83, जुईनगर येथील हरिओम मंदिराच्या समोरील रस्त्यावरचे पथदिवे व हायमास्ट त्याच प्रमाणे अमन सोसायटीकडे जाणारा रस्ता, शाहिर कृष्णा उद्यान, साईबाबा मंदिरा समोरील रस्ता या ठिकाणचे पथदिवे वारंवार बंद होत असतात. त्या ठिकाणी नवीन केबल टाकून नवीन एल.ई.डी. पथदिवे लावणे. | 34 / एप्रिल | 1636 / 26/04/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **25.** | **श्री. निवृत्त शंकर जगताप, यांजकडून :-** प्रभाग क्र. 29, घणसोली 2 या प्रभागात अनंतनगर, प्रगतीनगर, म्हात्रे आळी, बौध्दआळी, बौध्दवाडी, टेटरआळी, महादेववाडी, जयश्रीनगर, बाळारामवाडी, तीनबावडी, काफरी बाबा नगर, श्री करजूआई नगर ही नगरे येत आहेत. या सर्व नगरात असलेली गटारे तुबंली आहेत व खराब झाली आहेत. गटारामधून भूमीगत केबल टाकल्यामुळे गटारातील सांडपाणी पूर्णपणे वाहून जात नाही. केबलमुळे गटारे स्वच्छ करण्यास अडचण होत आहे व त्यामुळे मलरिया, डेंगु या रोगाचे प्रमाणे वाढत आहे. अर्थसंकल्प 2017-2018 मध्ये त्यासाठी तरतूद केली असून या प्रभागातील नगरांत गटारयोजना राबवून येथील गटारे पुन्हा नव्याने बांधणे. | 35<br>एप्रिल | 1637<br>26/04/2017 | मंजूर |
| **26.** | **श्री. श्री. निवृत्त शंकर जगताप, यांजकडून :-** प्रभाग क्र. 29, घणसोली 2 या प्रभागात असलेल्या नगरात असलेले पदपथ जे खराब झालेली आहेत. काही ठिकाणी नविन पदपथ बांधण्याची गरज असून जे चांगल्या प्रकारे टिकले जातील व पुन्हा-पुन्हा पदपथ करण्याची आवश्यकता लागणार नाही. यासाठी अर्थसंकल्प 2017-2018 मध्ये तशी तरतूद करण्यात आली आहे. तरी या पदपथांचे कॉक्रीटचे बांधकाम करणे. | 36<br>एप्रिल | 1638<br>26/04/2017 | मंजूर |
| **27.** | **श्री. निवृत्त शंकर जगताप, यांजकडून :-** प्रभाग क्र. 29, घणसोली 2 या प्रभागात सिडको नोड मधील सेक्टर 21-22 हे सेक्टर येत आहे. त्या ठिकाणी रहिवाशी राहण्यासाठी आले आहेत.मलनि:स्सारण वाहिन्या न टाकल्यामुळे येथील रहिवाशीयांची गैरसोय होत आहे. तरी या संपूर्ण प्रभागात मलनि:स्सारण वाहिन्याचे काम तातडीने होणे गरजेचे आहे.तरी प्राधान्य क्रमाने येथील मलनि:स्सारण वाहिन्या टाकण्याचे काम सुरू करणे. | 37<br>एप्रिल | 1639<br>26/04/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 28. | **श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 64, वाशी, सेक्टर-8 येथील आयप्पा मंदिरासमोरील पावसाळी गटार मोडकळीस आले आहे व पूर्ण स्लॅब कोसळून गटार बंद झाले आहे. तरी सेक्टर-8 येथील आयप्पा मंदिरासमोरील पावसाळी गटार नव्याने बांधण्यात यावे | 38<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 29. | **श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 64, अंतर्गत वाशी, सेक्टर-1ए येथील एन.एम.एस.ए. मैदानाभोवती पावसाळी पाणी जाण्यासाठी पावसाळी गटार बांधण्यात यावे. | 39<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 30. | **श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 64, वाशी, सेक्टर-8 येथील वीर सावरकर उद्यान व सी.डी. देशमुख येथे ज्येष्ठ नागरिक यांना बसण्यांकरिता गजोबा बांधणे. | 40<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 31. | **श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 14, से.19, प्लॉट नं. 62, 63, 64 सिडकोकडून हस्तांतरीत करून आगरी कोळी भवन बांधणे. | 41<br>एप्रिल | 1640<br>26/04/2017 | मंजूर |
| 32. | **श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 14, से.20 शनिमंदीरासमोरील प्लॉट नं. 34 व 43, वर जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र बांधणे. | 42<br>एप्रिल | 1641<br>26/04/2017 | मंजूर |
| 33. | **श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 14, ऐरोली से.20 मॅरेथॉन सोसायटीच्या चौकामधील जुने मोडलेले वाचनालय हटवून त्याठिकाणी पाण्याचा धबधबा (Water Full) तयार करून चौकाचे सुशोभिकरण करणे. | 43<br>एप्रिल | 1642<br>26/04/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 34. | **श्रीम. दमयंती बबन आचरे :-**<br>"प्रभाग क्र. 43, मधील से. 18, रूम नं. 450 ते बालाली नॉव्हेल्टी समोरील गटारांची सुधारणा करण्यात यावी. | 44<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 35. | **श्रीम. दमयंती बबन आचरे :-**<br>"प्रभाग क्र. 43, मधील से.17 रूम नं. 451 ते 717 पर्यंत हेवीड्युटी गटाराची सुधारणा करण्यात यावी. | 45<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 36. | **श्रीम. दमयंती बबन आचरे :-**<br>प्रभाग क्र. 43, मधील से.17 समुद्र हॉटेल ते निलकंठ टॉवर समोरील फुटपाथ सुधारणा करण्यात यावी. | 46<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 37. | **श्रीम. सायली नारायण शिंदे, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्र. 37, मधील वाढत्या गुन्हेगारीचे प्रमाण पाहता प्रभागात मुख्य ठिकाणी C.C.T.V. बसविण्यात यावे. | 47<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 38. | **श्रीम. सायली नारायण शिंदे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 37, मध्ये असणारे लोकउपयोगी भूखंड लवकरात लवकर सिडकोकडून ट्रान्सफर करण्यात यावे. | 48<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 39. | **श्रीम. सायली नारायण शिंदे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 37, हा बहुतांश माथाडी कामगार व कमी उत्पन्न असलेला प्रभाग आहे. उदरनिर्वाहासाठी येथील लोकांना भाजी विक्रीचा व्यवसाय करावा लागतो. परंतु प्रभागात भाजी मार्केटसाठी कोणतीही तरतूद नाही. याचा त्रास भाजीविक्रेते व महापालिका दोघांनाही होतो. म्हणून प्रभागातील नागरी सुविधांसाठी असलेल्या जागेवर नागरिकांसाठी भाजी मार्केट उपलब्ध करून देण्यात यावे. | 49<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 40. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-** प्रभाग क्र. 51 मध्ये कलश उद्यान सोसायटी बाहेरील फुटपाथला लोखंडी रेलींग कम्पाऊंड व नागरीकांना बसण्यासाठी शेड बेंचेस बसविण्यात यावे. | 50<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 41. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-** प्रभाग क्र. 51 मध्ये नागरिकांच्या सोईसाठी ठिकठिकाणी दिशादर्शक फलक लावण्यात यावे. | 51<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 42. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-** प्रभाग क्र. 51 अंतर्गत से.12 मध्ये स्मशानीभूमी मागील जो बिना रहदारीचा मार्ग आहे तिथे प्रभागातील नागरिकांच्या सोईसाठी भाजीपाला व फळमार्केट उभारण्यात यावे, | 52<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 43. | **श्रीम. पुनम मिथुन पाटील, यांजकडून :-** परमपूज्य डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांचे तैलचित्र सभागृहात लावणे. | 53<br>एप्रिल | 1643<br>26/04/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 44. | **श्रीम. पुनम मिथुन पाटील, यांजकडून :-** प्रकल्पग्रस्तांचे प्रेरणास्थान मा.लोकनेते स्व. दि. बा. पाटील साहेब यांचे तैलचित्र सभागृहात लावणे. | 54 / एप्रिल | 1644 / 26/04/2017 | मंजूर |
| 45. | **श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 103 मध्ये असलेल्या दुरावस्थेत असलेल्या जुन्या नागरी आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या ठिकाणी नवीन सर्व सोईयुक्त अशा आरोग्य व सुश्रुषा केंद्राची उभारणी करणे. | 55 / एप्रिल | 1645 / 26/04/2017 | मंजूर |
| 46. | **श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 103 मधील सेक्टर 8 आर्टीस्ट व्हीलेज मधील रस्त्यांच्या व पदपथांच्या बाजूकडील पावसाळी नाली गटारे नियमित देखभाल दुरूस्ती न झाल्याने बंद झालेली आहेत. अशा पावसाळी नाली गटारांची पुर्नबांधणी करणे. | 56 / एप्रिल | 1646 / 26/04/2017 | मंजूर |
| 47. | **श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-** प्रभाग क्र.103 क्षेत्रातील रस्त्यालगतचे तसेच मोकळ्या जागांवरील सिंगापूर कपोक, रेन ट्री, गुलमोहर या व अशा जातीतील शंभरपेक्षा जास्त संख्येचे मोठे वृक्ष हे मागील तीन वर्षात नैसर्गिक आपत्तीमुळे नष्ट झालेले आहते. अशा वृक्षांच्या ठिकाणी नवीन भारतीय जातीच्या वृक्षांचे रोपणासह अस्तिवात असलेल्या वृक्षांचे संरक्षण देखभाल करण्याची उपाययोजना करणे. | 57 / एप्रिल | 1647 / 26/04/2017 | मंजूर |
| 48. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 82, जुईनगर सेक्टर-24 गणेश मंदिर मार्ग येथे असलेल्या भुयारी मधील गटारांची दुरूस्ती करण्यात यावी. | 58 / एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 49. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 82, जुईनगर सेक्टर-25 गणेश मैदानात ओपन जिम करण्यात यावे. | 59 / एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 50. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 82, जुईनगर सेक्टर-24 येथील सिध्दीविनायक सोसायटी ते सुंदरम सोसायटीपर्यंत मलनि:स्सारण वाहिनी टाकण्यात यावी. | 60<br>एप्रिल | 26/04/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**